REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 9 | JUNE - 2022

# दलित पँथर उदय आणि अस्त ( १९७२ ते १९७८ )

**Dipak Bhika Ghodeswar**
M.Phil Student, Department of History, Mumbai University.

**सारांश :**

दलित पँथर अन्याय अत्याचार व गुंडगिरी विरुद्ध लढणारी संघटना म्हणून वाढलेली होती. आक्रमक बाण्यामुळे पँथर नेत्यांचे प्रस्त वाढलेले होते. सरकारी कार्यालये, पोलिस स्टेशन, इत्यादि व्यवस्थेशी पँथर कार्यकर्त्यांचे हितसंबद होते. त्याच्याच जोरावर स्थानिक लोकांचे प्रश्न सोडवले जात होते. पण, पुढे याचाच फायदा घेऊन संघटन फूटी व योग्य नेतृत्व नसल्याने संघटनामध्ये बेशिस्तपणा वाढून दादा, भाई, गुंड लोक पँथरच्या नावाने जगू लागलेले होते. त्यामुळे, लवकरच समाजातून पँथर विरुद्ध लोकांचे मत तयार झाले होते.




पँथर नेतांच्या वाढत्या तामझामामुळे कार्यकर्त्यांना नेत्यांचे खर्च सांभाळने मुशकिल झाले होते. त्यामुळे, लवकरच साधारण कार्यकर्ता या खर्चाकडे दुर्लक्ष करू लागला होता. व पँथर संघटने पासून दूर जाऊ लागला होता. संघटनेला पूर्णवेळ कार्यकर्ता नसने, सदस्य नोंदणी न करणे, संघटनेला फंडिंग न भेटने, कमी मनुष्यबळ, त्याग, समर्पण, व्यवहारिक दुष्टिकोन, विचार सरणीतील मतभेद या सर्वांच्या अभावी व प्रशिक्षित शिस्तप्रिय संघटन बांधनीत दलित पँथर मागे पडलेली होती. पँथर नेत्यांचे रिपब्लिकन नेत्यांप्रमाणेच हेवे-दावे मतभेद आणि अविश्वास निर्माण होऊन दलित पँथरचे गट- तट निर्माण झालेले होते. त्यामुळे, पँथरच्या निर्माण झालेल्या गट- तटामुळे पुन्हा एकदा समाज विभागला गेला व राजकीय आणि सामाजिक ताकत कमी कमी होत गेली होती.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या महापरीनिर्वाणा नंतर त्यांच्या अनुयायांनी एकत्र येऊन स्थापन केलेली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया काही काळातच ध्वस्त होऊन गटा तटामध्ये विभागली व वंचित, दलित, अस्पृश्य समाजाची राजकीय ताकत कमी होत गेली. त्यामुळे, विरोधकांची राजकीय ताकत वाढून, पुढील काळात त्याचे रूपांतर दलित, अस्पृश्य या घटकावर अन्याय-अत्याचार, भेदभाव, जातिवाद वाढण्यात झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या महापरीनिर्वाणा नंतरची दुसरी पिढी आता तरुण झालेली होती. महाविद्यालयालात जाणारी वाचक, न्याय, समता, स्वातंत्र मानणारी, संघर्ष करणारे आणि लढणारे, तरुण आता वाढत्या अन्याय अत्याचारा विरोधात रस्त्यावर उतरून चळवळ करू लागले होते.

राजकीय संघटित प्रतिनीधिक नेतृत्व न राहिल्याने समाजात या अन्याय अत्याचारा विरुद्ध संघटित संघर्ष करता येत नव्हता. त्यामुळे, अत्याचार ग्रस्त समाजातील शिकलेल्या आक्रमक तरुणांनी या समस्यांना तोंड देण्यासाठी एखादे लढावू संघटन काढावे यासाठी प्रयन्त सुरू केलेले होते. याच सर्व कारणामुळे पुढे, दलित पँथर या संघटनेचा उदय झाला होता. २९ मे, १९७२ साली, मुंबईत दलित पँथर या

संघटनेची स्थापना राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज. वी. पवार, अर्जुन डांगळे यांनी केलेली होती. दलित पँथरचा लढा हा माणसाला माणूस म्हणून अधिकार देण्यासाठीचा लढा होता. दलित पँथर ही संघटना अन्याय अत्याचार व जातीवादाच्या विरोधात संघर्ष करणारी संघटना होती. त्यामुळे, काही काळातच तिचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्र भर पसरुन पुढे संपूर्ण भारतातून विदेशात ही गेला होता. जिथे अन्याय-अत्याचार होत असे, तिथे दलित पँथरचे कार्यकर्ते लाठ्या काठ्या आणि हत्यार घेऊन पोहोचत होते. सभेत घुसने, हल्ला बोल करणे, आंदोलने करणे, निरदर्शने करणे, मोर्चे करणे, गाड्या अडवणे इत्यादी आक्रमक भूमिकामुळे दलित पँथर जन- माणसात पोहोचुन लोकप्रिय झालेली होती. परंतु, लवकरच दलित पँथर संघटना विघटनाकडे जाऊ लागली.

## उदीष्टे :

- आंबेडकरोत्तर चळवळी मध्ये दलित पँथर या संघटनेचा अभ्यास करायचा आहे.
- दलित पँथर या संघटनेच्या एतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकणे.
- दलित पँथरच्या कार्याचा आढावा घेणे.
- दलित पँथरच्या विघटनाची कारणे विश्लेषनात्मक आणि तुलनात्मक पद्धतीने अभ्यासाने.

## संशोधन पद्धती

एतिहासिक वर्णात्मक पद्धतीचा अभ्यास करून दलित पँथरचा इतिहास मांडण्यात आला आहे. प्राथमिक आणी दु य्यम साधंनाचा अभ्यास करून दलित पँथरचा उदय आणि अस्त यांचे सूक्ष्म पद्धतीने अध्ययन करण्यात आले आहे.

## एतिहासिक पार्श्वभूमी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर रिपब्लिकन पक्ष वेगवेगळ्या तुकड्यात विभागला गेला होता. रिपब्लिकन नेते मंडळी मोठ्याप्रमाणात कॉंग्रेस व इतर पक्षात गेलेले होते. त्यामुळे, वंचित, दलित, समाजाला नेतृत्व राहिले नव्हते. परिणामी गाव खेडा, अशा ठिकाणी दडपशाही, अन्याय, अत्याचार जातिभेद वाढू लागला होता. या सर्व घटनांचा उद्रेक म्हणजे, पाणवटे विहरी, नदी, तलाव या ठिकाणी पाणी न भरू देणे, सार्वजनिक ठिकाणी भेदभाव करणे, बलात्कार व हत्या करणे, नग्न धिंड काढणे, पिके नष्ट करणे, वरात न काढू देणे, घरे जाळणे, जीवंत जाळणे, जमिनी बळकावणे, संपूर्ण गावाने बहिष्कार टाकणे इत्यादी जातीय अत्याचार रोजचं वाढत चालले होते. या सर्व सामाजिक कारणामुळे नेतृत्व हारवलेल्या दलित, वंचित, अस्पृश्य समाजावर वाढत्या अन्याय-अत्याचाराच्या घटना आणि न मिळणाऱ्या न्यायामुळे हताश झालेला तरुणांनी समाजाला न्याय देता येईल व समाजावर कुणी अन्याय अत्याचार करण्यास धजावणार नाही यासाठी, एक नवीन संघटना काढण्याचा यशस्वी प्रयन्त केला होता. याच संघटनेला त्यांनी दलित पँथर असे नाव दिले होते. [1]

१९७१ साली प्रसिद्ध झालेल्या पेरूमल समितीच्या अहवाला अनुसार वंचित, दलित, घटकांना पानवटे, नदी, विहीर, सार्वजनिक नळ इत्यादी ठिकाणी पाणी भरण्यात सक्त मनाई केली जात होती. सार्वजनिक खाद्यालये, दुकाने येथे भेदभावकरणे, नाव्ह्या कडून केंस न कापणे, धोबी कडून मनाई, सरकारी कार्यालयात भेदभाव करणे, दलित महिलांची नग्न धिंड काढणे, बलात्कार करणे, शेतातून दम दाटी देवून रस्ता काढणे, संपूर्ण गावाकडून दलित वस्तीवर सार्वजनिक बहिष्कार टाकणे, पिके नष्ट करणे, गावातून वरात नेण्यास मनाई करणे इत्यादि सर्व अन्याय -अत्याचार वंचित दलित समाजावर सवर्ण व उच्छ जातीतील लोक सतत करत होते. या सर्व अमानुष घटनामुळे पिडीत समाजाला संघर्ष करून न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमक झालेल्या तरुणांनी ब्लॅक पँथर या अमेरिकन काळ्या निग्रो लोकांच्या चळवळीच्या धरतीवर महाराष्ट्रात दलित पँथर नावाची संघटना स्थापन केली होती. [2] जुलूम जबरदस्ती व वर्णवादावर हल्ला करणाऱ्या ब्लॅक पँथरच्या प्रेरणेतून दलित पँथरची स्थापना आंबडेकरी नव तरुणांनी केलेली होती. अमेरिकेतील ब्लॅक पँथर ( १९६७ ते १९६९ ) या संघटनेचा लढा वर्ण संघर्षाचा, शिक्षण, अन्न, वस्त्र व निवाऱ्यासाठी लढा होता. तर, दलित पँथर या संघटनेचा लढा ( १९७२ ते १९७४ ) हा वर्ण जाती, समता, बंधुता, न्याय आणि अधिकार नाकारणाऱ्याच्या विरोधातला लढा होता.

वरीळीतील दंगल, पुणे येथील इंदापूर मधील दलित बहिष्कार विरोधी मोर्चा, गीता-मनुस्मृती विरोधात आंदोलने, शिष्यवृतीसाठी आंदोलने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशनासाठी आंदोलन करून सरकारला दिलेले निवदने तसेच, अन्याय अत्याचाराच्या ठिकाणी जाऊन लढा लढण्याच्या पद्धतीमुळे दलित पँथर पुढे महाराष्ट्रभर आक्रमक संघटना म्हणून पसरली होती. [3] संवर्ण व उच्चजातीच्या जुलूम दडपशाही याच्या विरोधात ब्लॅक पँथरच्या प्रेरणेनेतून दलित पँथरची स्थापना आंबेडकरी नव तरुणांनी केली होती. दलित पँथरच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयन्त त्यांनी केला होता.

## दलित पँथर उदय

दलित पँथर म्हणजे कष्टकरी, भूमिहीन, शेतमजदूर, कामगार, महिला, आदिवासी, भटके विमुक्त, वंचित, दिन-दुबळ्या समूहासाठी संघर्ष करणारी व लढणारी संघटना होती. दलित पँथर ही सुशक्षित शिक्लेले नव तरुणांचे संघटन होते. त्यात कवि, साहित्यक, लेखक, विचारवंत व अभ्यासक होते. दुर्गा भागवत यांचा महाराष्ट्र टाइम्स मधील २४/ ०४/ १९७२ रोजी छापून आलेल्या महिलांच्या वैश्या व्यवसायाच्या आक्षेपार्ह लेखावर राजा ढाले, नामदेव ढसाल यांनी कडाडून विरोध केला होता. पुढे, याच आक्रमक लढणाऱ्या तरुणांनी एकत्र येऊन दलित पँथर या संघटना स्थापनेची मुहर्त रोवली होती. [4] दलित पँथरच्या नेत्यांच्या निषेध कविता, दलित काव्य व साहित्य निर्मितीचा दलित पँथरच्या संघर्ष काळात उपयोग झाला होता. समाजातील वर्ण-जाती समर्थक व संविधानाच्या विरोधकांशी नेहमीच समता व आंबेडकरवादी तरुणांचा संघर्ष होत होता. त्यामुळे, त्यांनी एकत्र येऊन संघर्ष करणारी संघटना दलित पँथरच्या स्थापनेसाठी पुढाकार घेऊन सुरवात केलेली होती. त्यामुळे, बंडखोर पँथर कवितामुळे समाजात संघर्ष निर्माण करत न्यायीक लढा उभा राहिला होता.

२९ मे, १९७२ रोजी दलित पँथरची स्थापना झाली होती. तशी बातमी १९ जून, १९७२ सालच्या नवाकाळ आणि २६ जून, १९७२ रोजी प्रजासत्ताक या पत्रकात नामदेव ढासळ, ज. वी. पवार, राजा ढाले यांचा पँथर संस्थापक म्हणून उल्लेख करणारी बातमी प्रसिद्ध झाली होती. ९ जुलै, १९७२ रोजी पँथर संघटनेचा सिद्धार्थनगर मुंबई येथे पहिला मेळावा पार पडला होता. [5] एक लढावू बाणा जोपासणारी तसेच आक्रमक व अन्याय- अत्याचाराच्या विरोधात लढणारी आणि हिंदुत्ववादावर प्रखर टीका करणारी, अन्यायाच्या ठिकाणी जाऊन लढणारी व न्याय मिळून देणारी संघटना यामुळे, लवकरच दलित पँथर जनमाणसात प्रसिद्धीस आली होती.

दलित पँथर हा काही राजकीय पक्ष नव्हता. त्यामुळे, त्याच्या जाहिरनाम्याचा प्रश्नच नव्हता. पण दलित पँथरच्या नेत्यांची भाषणे, लेख, व्याखाने, सभा, आंदोलने, मोर्चे, त्यांची प्रसिद्धी प्रतके, या सर्वातून दलित पँथरची भूमिका स्पष्ट होत होती. सर्व सत्ता दलितांच्या हाती ही दलित पँथरची घोषणा होती. प्रथमच दलित पँथरचा बुलंद जाहीरनामा मराठा या वृत्तपत्राने “आम्हाला ब्राम्हण आळीत जागा नको, साऱ्या देश्याचे राज्य हवे” या घोषनेच्या शीर्षकाखाली २१ नोव्हेंबर, १९७३ रोजी प्रसिद्ध केला होता. [6] . दलित पँथरच्या लढावू भूमिकामुळे जनतेच्या समस्यासाठी लढणारी दिन दुबळ्यांसाठीआवाज उठवणारी संघटना म्हणून नावारूपास आली होती. दलित पँथरच्या नेत्यांनी पँथरला मोठे करण्यासाठी सुरुवातीच्या काळात संघटना वाढीसाठी काही कार्यक्रम हाती घेतले होते. वंचित दलितांच्या हितासाठी ते न्यायिक मार्गाने लढा उभारत राहिले होते. त्यातूनच त्यांनी समाजाच्या हितासाठी संघर्ष सुरू केलेला होता.

## दलित पँथरचा कार्याचा आढावा

ऐरणगावच्या रामदास नारनवरे यांचा १२ ऑगस्ट, १९७२ रोजी गावकऱ्यांनी जातीय मानसिकेतून नरबळी देत सामूहिक हत्याकांड घडवून आणला होता. याच्या विरोधात दलित पँथर ने संपूर्ण महाराष्ट्रभर विरोध केला होता. १५ ऑगस्ट, १९७२ रोजी वाढत्या जातिवाद व अत्याचाराच्या विरोधात काळा स्वातंत्र दिन साजरा करण्यासाठी मुंबईमध्ये आझाद मैदानात काळी फीत लावून व विधानपरिषदेवर काळे झेंडे नेवून पहिला मोर्चा म्हणून दलित पँथरने मोठ्या संखेने पार पाडला होता. [7] ऐरणगावच्या निषेधार्थ १२ सप्टेंबर, १९७२ रोजी मनुस्मृतीची प्रेत यात्रा काढली गेली होती. १७ सप्टेंबरला, पँथरने युवजन आणि समाजवादी पक्षासोबत संयुक्त मोर्चा अन्याय अत्याचाराच्या विरोधात काढला होता.

समाजाकडे नेहमीच दुर्लक्ष करणारे व अत्याचार विरोधात साथ न देणाऱ्या रिपब्लिकन नेते रूपवते, गवई, सोनुले यांचा नेहमीच कॉंग्रेसला साथ सहयोग देण्याच्या भूमिकेच्या विरोधात १८ सप्टेंबर, १९७२ रोजी दलित पँथरची पहिली अटक व निरदर्शने झाली होती. तर, बाबू जगजीवनराम यांनी दलित हत्याकांडमध्ये बेजबाबदारपणे केलेल्या वतव्याच्या विरोधात दलित पँथरने इतिहासातील पहिली मास अटक २४ सप्टेंबर, १९७२ रोजी दिली होती. [8] दलित पँथरच्या अन्याय अत्याचाराच्या ठिकाणी जाऊन लढण्याच्या व गुंडांना सामूहिकपणे धडा शिकवण्याच्या पद्धतीने पँथरची आक्रमक संघटना म्हणून जनमाणसात प्रतिमा तयार झाली होती. त्यामुळे, पँथरला खेड्यापाड्यात जनमाणसांचे बळ मिळून पँथर आता खेड्या पाड्यात लढणारी संघटना म्हणून वाढू लागली होती.

१४/ १२/ १९७२ रोजी पुण्यात भुगाव, मुळशी येथे मालन हरिभाऊ जगताप या महिलेच्या बलात्कार प्रकरणी पँथरनेते तेथे गेले होते. त्यात अविनाश महातेकर, नामदेव ढसाळ यांचा समावेश होता. तेव्हा पँथरच्या आक्रमक व लढावू दरारामुळे गावातील प्रतिष्ठित गावकऱ्यांनी पँथरपुढे शरणागती पत्करली होती. त्यामुळे, संपूर्ण महाराष्ट्रभर दलित पँथरचा दरारा वाढला होता. ८ जानेवारी, १९७३ साली इगतपुरी मधील गुंडासोबत पँथरच्या कार्यकर्त्यांची लढाई आणि पिंपरी चिंचवड मधील प्रवाशांना नेहमी लुटणाऱ्यागुंडासोबत भिडलेले पँथर कार्यकर्ते यामुळे, लुटारू व गुंडांना दलित पँथरचा राज्यव्यापी धाक बसला होता. [9] लोक या संघटनेला दुबळ्या लोकांच्या पाठीशी उभी राहणारी संघटना म्हणून पाहू लागले होते. त्यामुळे, पुढे जळगाव, नाशिक, मनमाड, भुसावळ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दलित पँथरच्या शाखा सुरू होण्यास सुरुवात झाली होती. पुढे, पँथरच्या शाखा ह्या महाराष्ट्रा बाहेर गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, पंजाब लंडन व इतर ठिकाणी ही स्थापन होण्यास सुरुवात झाली होती. त्यांचे पत्र व्यवहार पँथरच्या नेत्यांशी होते.

१९७३ साली चेंबुर पेस्तम सागर येथील गुंड वायकुलने दलित महिलेचा विटंबना करण्याचा प्रयन्त केला होता. पुढे, हे प्रकरण दलित पँथरकडे जाऊन स्थानिक पँथर आक्रमक झाल्यामुळे गुंडावर कारवाई झाली होती. तेव्हा पासून मुंबईत पँथर मोठी होण्यास सुरुवात झाली आणि चेंबुर, घाटकोपर, मुलुंड, भांडुपमध्ये पँथरच्या शाखा स्थापन होण्यास सुरुवात झाली होती. खार येथील तीन बंगला झोपडपट्टीत रामस्वामी हा दक्षणी भाषिक गुंड होता. त्याने एका महिलेवर अतिप्रसंग केला तेव्हा तेथील स्थानिक वातावरण चांगलेच तापले होते. पँथर कार्यकर्त्याच्या मदतीने या प्रकराणात दलित पँथरच्या नेतृवाने रामस्वामीला शिक्षा घडवून आणली होती. [10] असेच एक प्रकरण १९७३ साली ताडदेव येथील उषा किरण इमारतीच्या पायथ्या शेजारील झोपडपट्टीत ७ गुंडांनी महिलेवर बलात्कार केला होता. पँथरच्या आक्रमक आंदोलनामुळे आरोपी सातही गुंडांना तेव्हा शासन झाले होते. पँथरच्या काळात मुंबईतील काही अन्याय अत्याचारच्या घटना महत्वाच्या होत्या. दलित पँथरने या घटनांना न्याय मिळवून दिला होता. त्यामुळे, पुढे दलित पँथरच्या मुंबईत वेगाने शाखा सुरू झाल्या व मोठ्याप्रमाणात कार्यकर्ते दलित पँथरला जुडू लागले होते.

७ मार्च, १९७३ रोजी बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या आव्हानाला न जुमानता जातिभेद मानणाऱ्या हक्क, अधिकार नाकारणाऱ्या ग्रंथाची होळी म्हणून दलित पँथरने गीता, मनुस्मृती या ग्रंथाचे दहन शिवाजी पार्क येथे जाहीरपणे केले होते. तेव्हा मोठ्या प्रमाणात मुंबईत दंगल घडली होती. [11] दलित पँथर मोठी होत असताना त्यांचा ब्राम्हणवादी हिंदुत्ववादी संघटनाशी संघर्ष हीवाढत गेला होता. त्यामुळे, पुढे आंबडेकरीवादी विरुद्ध ब्राम्हणवादी संघर्ष घडून समाजात दंगली घडल्या होत्या.

जगन्नाथपुरीचे शंकराचार्य यांनी वर्ण व्यवस्थेच्या समर्थनात " चांभार कितीही शिकला तरी, चांभारच राहील " असे जातीय गैर अधिकाराची असमानता दर्शवणारी टिप्पणी केली होती. त्यांचा विरोध म्हणून दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी कोल्हापुरात १८ मार्च, १९७३ साली शंकराचार्याला चपला फेकून मारून मारत निषेध केला होता. दलित पँथरच्या आक्रमक पवित्र्याच्या भीतीपोटी शंकराचार्यने मुंबईत येणे टाळले होते. [12] त्यामुळे, पुढे महाराष्ट्रभर असंतोष निर्माण होऊन पुढे, २० मार्च, १९७३ रोजी सांगलीच्या मुरलीधर मंदिरात शंकराचार्याला काळे झेंडे दाखवून विरोध केला गेला होता. २९ मार्च, १९७३ साली पुण्याच्या रास्ता पेठेत पुन्हा त्यांना पँथर कार्यकर्त्यांनी जोडे मारून फेकले होते. ६ ऑक्टोबर, १९७३ रोजी महाराष्ट्र सरकारने राजभवन समोर वैदिक ब्राम्हणाचा सत्काराच्या कार्यक्रम सरकारी निधीतून ठेवला होता. त्यामुळे, दलित पँथरचे नेते व बाबा आढाव यांनी विधान परिषेदे समोर या ब्राम्हणी सत्काराचा विरोध केला होता.

जातीय भावनांना खत पाणी म्हणून निवडणुका जातीं धर्मानुसारच होतात, त्यामुळे राजकीय लोकशाही धोक्यात आली होती. असे मत दलित पँथर मधील नेत्यांचे होते. म्हणून, १९७३ सालच्या मुंबई महानगरपालिका निवडणुकावर दलित पँथरने जाहीरपणे बहिष्कार टाकला होता. या विषयाशी संदर्भात १४ ऑगस्ट, १९७३ रोजी दलित पँथरने मोठा मोर्चा काढला होता. या मोर्चाचे नेतृव ज. वि. पवार, राजा ढाले, अविनाश महातेकर, नामदेव ढसाळ यांनी केले होते. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशीत करावे ही दलित पँथरची प्रमुख मागणी होती. [13] पोलिसांच्या डपशाही व जुलूम जबरदस्ती व सरकारी पोलिस भरतीत ३० % ते ४० % टक्के जागा दलितांना द्यावे यासाठी व दलितांवरील अत्याचार शोषण पाहता वेगळ्या दलितस्थानची प्रदेशाची मागणी करत हा मोर्चा काढण्यात आला होता. दलित पँथरने वेळोवेळी लोकशाहीला पूरक अश्या धोरणांसाठी आंदोलने करत भूमिका सुद्धा तेव्हा घेतलेली होती. त्यामुळे, दलित पँथर ही संविधान व लोकशाहीला मानणारी होती. म्हणूनच, त्यांनी संवैधानिक पद्धतीनेच आंदोलने केलेली होती.

पुण्यातील राजगुरूनगर खेड येथील आसखेडा गावी विठू मोरे यांची ३० एक्कर जमीन बाबुराव लिंबोरे याने जातीय मानसिकेतून बंदुकीच्या धाकाने बळकावली होती. विठू मोरे मुबईत पळून येऊन मरीन लाईन्स येथे ब्रिज खाली राहू लागले होते. मुबईतील पँथरच्या कार्यकर्त्याने मोरे यांची भेट पँथर नेत्यांशी त्यांची ओळख करून दिलेली होती. तेव्हा या घटेनेचा निषेध करण्यासाठी १३ ऑक्टोबर, १९७३ रोजी मुंबई आणि पुण्यातील असंख्य पँथर कार्यकर्ते आसखेडा या गावी जमा झाले होते. [14] पँथर कार्यकर्त्यांच्या येण्याआधीच बाबुराव लिंबोरे आसखेडा इथून पळून गेलेला होता. गावातील जाणत्या आणि मान्यवर लोकांच्या समक्ष विठू मोरे यांना त्यांच्या जमिनीचा ताबा देण्यात आला होता. असाच एक वाद पुण्यातील येणेरे गावात बौद्ध स्मशान भूमीतून जबदस्ती रस्ता नेण्याचा होता. पँथरचा नेत्यांचा तेथे हस्तक्षेप झाल्याने गावकऱ्यांनी त्यांची जमीन परत केली होती. पुण्यातील गोनवडी गावातील दलिताची जमिन कसण्याच्या नावाखाली बाळकवण्याचा प्रयन्त करून पीडित कुटुंबला जमीन कसणारा मोहिते हा जातीय भावनेतून धमकावून गावातून काढण्याची भाषा करत होता. पँथर नेते व कार्यकर्त्यांनी गोनवडी गावी जाऊन धमकवनाऱ्या मोहितेला संपूर्ण गावकऱ्यांच्या समोरच धडा शिकवला होता. प्रा. कुकडे व प्रा. जोशी या दोन सवर्ण प्राध्यापकानां न्याय मिळवून देण्यासाठी सुद्धा जातीपाती सोडून दलित पँथर त्यांच्या पाठीशी उभी राहिली होती. समाजाच्या न्याय हक्कासाठी लढताना दलित पँथर वर्ण जात भेद न मानता सर्व जाती धर्माच्या जनतेसाठी लढा उभारत होती.

पुण्यात एरपोर्टवर इंद्रा गांधी यांचा खुलेआम विरोध दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी केला होता. त्यात मोठ्या प्रमाणात कॉग्रेसच्या नेत्यांनी नियोजीत हिंसा केली होती. पण पोलिसांनी डपशाही करून पँथर कार्यकर्त्यां वरच कारवाई केली होती. त्यामुळे, इथून पुढे आंदोलने मोर्चाला येताना लाठ्या-काठ्या घेऊन येण्याचे पँथर नेत्यांनी लोकांना आव्हान केले होते. [15] नामदेव ढसाळ यांनी ८-७-१९७४ रोजी एक पत्रक काढून, लोकशाही बंदुकीने चालत नाही तर, सरकार व जातिवादी शक्ति यांच्या अत्याचाराला तोंड देण्यासाठी जागोजागी संरक्षण पथके उभारु व त्यांचा मुकाबला करु अशी सरकारला आव्हान करत भूमिका घेतली होती.

अकोला जिल्यातील धाकली या गावी २६ सप्टेंबर, १९७४ रोजी गावातल्या पाटलाने दोन गवई भावांचे डोळे काढले होते. तेव्हा, पँथरच्या आक्रमक आंदोलनामुळे तत्कालीन मुख्यमंत्र्याला कारवाई करावी लागली होती. भारताला पंचवीस वर्ष झालेत स्वातंत्र मिळून पण, आजही दलीत वंचित समाजाला न्याय, हक्क मिळत नाहीत त्यांचे रोजचं हत्याकांड होतात. म्हणून, पँथर नेत्यांनी प्रजासत्ताक दिंनानिम्मीत २५ जानेवारी, १९७५ रोजी मध्यरात्री मशाल मोर्चा काढलेला होता. पण, पोलिसांच्या दडपशाहीमुळे पँथर नेत्यांना अटक करण्यात आले होते. [16] या मोर्च्याचे नेतृत्व रामदास आठवले, अविनाश महातेकर, ज.वी. पवार, यांनी केलेले होते. तशी बातमी सांज मराठा ३०/ १/ १९७५ या पत्रकात छापून आली होती. हा मशाल मोर्चा चेंबुर, घाटकोपर, भांडुप, ठाणे, नाशिक, नागपुर, अकोला इत्यादि ठिकाणी काढण्यात आला होता.

१४ एप्रिल ते १ मे, १९७५ हा पंधरवडा महाराष्ट्र सरकारने गांधीजी एवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिन म्हणून साजरा करायचा ठरवला होता. त्याचा निषेध म्हणून १३ एप्रिल, १९७५ रोजी राजा ढाले, रामदास आठवले, भाई सांगरे, सुरेश सावंत, विठ्ठल साठे, मुख्यमंत्र्यांना भेटलेले होते. तुम्ही हा पंधरवडा साजरा केला तर आम्ही गांधीजीच्या साहित्याची होळी करु, असे निवेदन ही मुखमंत्र्यांना दिले होते. व तसे पत्रकच पँथर नेत्यांनी जाहीर करून, २९ एप्रिल, १९७५ रोजी आझाद मैदान येथे भव्य मोर्चा काढून गांधीच्या

साहित्याची होळी पँथर नेत्यांनी केली होती. राजा ढाले, रामदास आठवले, भाई सांगरे, सुरेश सावंत, विठ्ठल साठे यांना अटक झाली होती. अशी निर्दशने औं रगाबाद नांदेड, नागपुर, मुंबई इत्यादि ठिकाणे केली गेली होती.[17] वाढत्या बेकारी विरोधात व साहित्य प्रकाशन करिता १७ जानेवारी, १९७६ रोजी मुख्यमंत्र्याची भेट घेत पँथरने मागणीला आक्रमक करत निवेदन दिली होत. यावेळी रामदास आठवले, ज. वी. पवार, दत्ता जाधव उपस्थित होते. आंदोलनाच्यानंतर काही काळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशित झाले होते. तशी बातमी नवशक्ति १८-१-१९७६ या पत्रकात छापून आली होती.

मुंबई मधील गिरणी कामगारांचे तसेच, रेल्वे कामगाराचा त्याकाळी सतत संप होत होता. त्यावेळी, दलित पँथरचे नेते व कार्यकर्ते मोठ्याप्रमाणात त्यांच्या संप किवा मोर्चे, आंदोलने यात शामिल होत होते. त्यामुळे मराठा, तेली, मुसलमान, तांबोळी व इतर जाती धर्माचे लोक पँथरमध्ये येऊ लागले होते.[18] पँथरने सर्व जाती धर्माच्या लोकांच्या न्याय, हक्क व अधिकारासाठी पुढाकार घेत त्यांच्या सोबत लढून न्यायिक लढा उभारलेला होता. त्यामुळे, पँथर ही सर्व जाती धर्माची संघटना झाली होती.

## दलित पँथर अस्त

दलित पँथरच्या आक्रमक काळात वरळी दंगल ही चांगलीच गाजलेली होती. त्यात भागवत जाधव या कार्यकर्त्याची हत्या व रमेश देवरुखकर या पँथर तरुणाची गोळ्या घालून हत्या या महत्वाच्या घटना घडलेल्या होत्या. दंगलीचा जाब रिपब्लिकन नेत्यांना विचारुन त्यांचा ठीक-ठिकाणी अडवून विरोध पँथरन कार्यकर्त्यांनी केलेला होता. जातीय अन्यायामुळे दलित पँथरने निवडणुकांवर बहिष्कार सुद्धा टाकलेला होता. त्यामुळे, रिपब्लिकन नेते पँथरवर चांगलेच तापलेले होते. म्हणूनच, रिपब्लिकन नेत्यांनी दलित पँथरच्या नेत्यांचा समाचार घेत प्रतेक ठिकाणी त्यांच्यावर आरोप करत टीका करायला सुरुवात केलेली होती.[19] शांतबाई दाणी यांनी दलित पँथरला जाती-जातीत तेढ निर्माण करणारे व समाजाला चिकटलेला कॅन्सर अशी उपमा दिलेली होती. तर गवई यांनी अमरावती येथे पँथर ही कम्युनिष्ठांची दलाल आहे अशी टीका केली होती. बी. सी. कांबळे यांनी तर दलित पँथरला शिव्या देणारे संघटनच म्हंटले होते.

अत्याचाराला वाचा फोडून सायकल काठ्या, चैन, रोड, हत्यारे घेऊन पँथर कार्यकर्ता घटना घडलेल्या ठिकाणी हजर राहून प्रसंगी विरोधकांशी दोन हात सुद्धा करायला तयार राहत होते. हिंदू देवी देवत्नावर हल्ले करणे, त्यामुळे, इतर समाज दूर जाऊ लागलेला होता. तसेच, पँथर नेते जेथे जात तेथील बिल ही स्थानिक कार्यकर्त्यांनाच भरावी लागत होती. राजा ढाले, नामदेव ढासळ सर्वात अग्रगणी होते. त्यात टॅक्सी ते हॉटेलचे बिल खूप मोठी मोठी होती. तसेच, ढाले आणि ढसाळ यांना मार्गदर्शन करणारे आवडत नव्हते.[20] असभ्य, अवार्च, शिवराल भाषा, आक्रमकपणा, तचेस सभा उधळने हे पँथर नेत्यांचे नेतृव गुणच होते. वरळी आणि मराठवाडा दंगलीच्या वेळेस कार्यकर्त्यांना कोर्ट व इतर सामाजिक मदत पँथर कडून न मिळाल्याने त्याच्या संघटन शक्तिच्या अस्ताला सुरुवात झाली होती.

दलित पँथरच्या नेत्यांमध्ये मतभेद हे पँथरच्या स्थापने पासून होते. राजा ढाले यांचा संस्थापक असा उल्लेख पत्रकावर लिहल्याने नामदेव ढसाळ नाराज होत होते. तसेच, वर्तमान प्रतके सुद्धा मुद्दामच दलित पँथर मधील एकाच नेत्याला किवा त्याच्या भाषणाला प्रसिद्धी देत होते. त्यामुळे, इतर पँथर नेते प्रसिद्धीस नाराज होत होते. राजा ढाले हे नामदेव ढसाळ कम्युनिस्ट आहे असे भरसभेत सांगत होते. तर, नामदेव ढसाळ यांचा गीतादहनाच्या कार्यक्रमाला अनुपस्थिती हे पँथर नेते आणि ढसाळ यांचं मतभेद दर्शवत होते. त्याशिवाय, मी हाडाचा कम्युनिस्ट आहे. अस ढसाळांच्या बातम्यामुळे दलित पँथरमध्ये मतभेद वाढतच गेलेले होते.[21] वृत्तपत्राने यात तेल ओतून आक्रमक आंबेडकरी संघटना फोडण्यात सुनियोजित हातभारच लावलेला होता. कम्युनिस्ट असण्याचा संदर्भ सर्वात प्रथम महाराष्ट्र टाइम्स ने वापरुन वाद लावला होता. पँथर नेत्यांच्या आडमुठी भूमिका व वर्तमान पत्रांच्या फोडीच्या बातम्या पँथर फुटीला सहाय्यक ठरलेली होती. त्यामुळे, दलित पँथर विघटनाकडे जाऊ लागली होती.

नामदेव ढसाळ व राजा ढाले यांचा वाद विकोपाकला जाऊन नामदेव ढसाळ यांना दलित पँथरमधून काढून टाकण्यात आले होते. अशी बातमी विशाल सह्याद्रि १८-८-१९७४ व नवशक्ती ८-८-१९७४ मध्ये छापून आली होती.[22] राजा ढाले व नामदेव ढसाळ यांच्या वादामुळे पुढे दलित पँथरचे गट पडण्यास सुरुवात होऊन दलित समाज शक्तिहीन होऊ लागला होता. त्याचे रूपांतर ढाले व ढसाळ गटात

होऊन पुढे त्यात सांगरे- महातेकर, गाडे असे अनेक गट-तट निर्माण झाले होते. पँथर नेंतृत्वात गटबाजीत ढसाळ कोंग्रेस सोबत कधी शिवसेना तर कधी जनता पक्षाशी हात मिळवणी करत राहिलेले होते.

राजा ढाले आणि नामदेव ढसाळ, ज. वी. पवार यांच्या वैचारिक मतभेदाने नागपुर येथे २४ ऑक्टोबर, १९७४ दिनी बैठकीत निर्णय होऊन नामदेव ढसाळ यांची हाकलपट्टी केली गेली होती. राजा ढाले जरी अध्यक्ष असले तरीही गट वार नेत्यांमुळे व अविश्वासामुळे पँथरमध्ये सर्वोच्च नेता तेव्हा कुणीच नव्हता. [23] नामदेव ढसाळ यांची बरखास्त सभा घेऊन सर्वानुमते राजा ढाले यांना अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. अशी बातमी लोकसत्ता २५-१०-१९७४ मध्ये तेव्हा, सुद्धा छापून आलेली होती.

७ मार्च, १९७७ रोजी पत्रकार परिषद घेऊन राजा ढाले यांनी दलित पँथर बरखास्त करण्याची घोषणा केलेली होती. पण, महाराष्ट्र भर याचा विरोध होऊ लागला होता. त्यामुळे, लोकांच्या कल्याणाकरीता पुढे काही पँथर नेत्यांनी त्यात अरुण कांबळे, रामदास आठवले, दयानंद म्हसके यांनी नवी भारतीय दलित पँथरची स्थापना केली होती. [24] भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष अरुण कांबळे झाले होते तर, संघटक रामदासजी आठवले झाले होते. त्यांनी पुढे दलित पँथरच्या माध्यमातून नामांतर, रीडल्स प्रकरण व दलित, वंचित, अस्पृश्य, महिला, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासाठी आंदोलने, मोर्चे, सभा, निवेदन, निरदर्शनाच्या मार्गाने न्यायिक लढा लढत न्याय मिळवून देण्याचे काम केले होते.

## संदर्भ सूची :

1) पवार ज. वी, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, अस्मिता कम्युनिकेशन, बोरवली, ६ डिसेंबर, २०१०.
2) मुरूगकर लता, *दलित पँथर चळवळ,* सुगावा प्रकाश, पुणे, १५ ऑगस्ट, १९९५.
3) शिरवाळे चंदन*, योद्धा* , प्रथम आवृती, जिज्ञासा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००३.
4) दिनेश मोरे*, मराठवड्यातील दलित चळवळीचा इतिहास*) इ .स .२००० पर्यंत ( आनंद प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती १ जानेवारी २०१६.
5) ढसाळ नामदेव, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४.

---

[1] ज. वी. पवार, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, अस्मिता कम्युनिकेशन, बोरवली, ६ डिसेंबर २०१०, पानं – १५

[2] लता मुरूगकर, *दलित पँथर चळवळ,* सुगावा प्रकाश, पुणे, १५ ऑगस्ट, १९९५, पांन क्रं- ४७, ५२

[3] चंदन शिरवाळे, *योद्धा* , प्रथम आवृती, जिज्ञासा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००३, पांन क्रं -२७

[4] डॉ. मोरे दिनेश*, मराठवड्यातील दलित चळवळीचा इतिहास* (इ. स. २००० पर्यंत ) आनंद प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती १ जानेवारी, २०१६, पान क्र- ४६०

[5] लता मुरूगकर, *दलित पँथर चळवळ,* सुगावा प्रकाश, पुणे, १५ ऑगस्ट, १९९५, पांन क्रं-७६

[6] ज. वी. पवार, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, ,अस्मिता कम्युनिकेशन, बोरवली, ६ डिसेंबर, २०१०, पानं- १४४

[7] नामदेव ढसाळ, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४, पान क्र- ४४

[8] ज. वी. पवार, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, अस्मिता कम्युनिकेशन, बोरवली, ६ डिसेंबर २०१०, पानं - ६५,७४,७८

[9] कित्ता पानं क्रं - ९४,१०८

[10] कित्ता पानं क्रं - ११४, ११६, ११७

[11] कित्ता पानं क्रं - १२२

[12] कित्ता पानं क्रं - १३९

[13] कित्ता पानं क्रं - १४४

[14] कित्ता पानं क्रं – १५३, १५४

[15] नामदेव ढसाळ, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४ पान क्र- ९५

[16] ज. वी. पवार, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, ,अस्मिता कम्युनिकेशन, बोरवली, ६ डिसेंबर, २०१०, पानं -२५८, २७१

[17] नामदेव ढसाळ, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४ , पान क्र -२७७

[18] नामदेव ढसाळ, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४ ,पान क्र -२२४

[19] नामदेव ढसाळ, *दलित पँथर,* भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४, पान क्र - १७

[20] चंदन शिरवाळे*, योद्धा* , जिज्ञासा प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००३, पांन क्रं -३५

[21] नामदेव ढसाळ, *दलित पँथर*, भाष्य प्रकाशन, मुंबई, १५ फेब्रुवारी, २०१४ ,पान क्र - २१

[22] ज. वी. पवार, *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड चौथा : १९७२ ते १९७७, अस्मिता कम्युनिकेशन, ६ बोरवली, डिसेंबर २०१०, पानं - २१९ ,२३२

[23] लता मुरूगकर, *दलित पँथर चळवळ,* सुगावा प्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट, १९९५ , पांन क्रं-८२, १०० ,११३

[24] कित्ता पान-३१०